फ. ए. सोसायटीचे,

# मुधोजी महाविद्यालय, फलटण

# राष्ट्रीय सेवा योजना २०१७–१८

# वार्षिक अहवाल

महाविद्यालयीन युवकांमध्ये समाज, राष्ट्र आणि विश्व यांप्रती संवेदनशीलता, सजगता व जाणीव जागृती व्हावी तसेच या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, देशनिष्ठा, सामाजिक बांधिलकी व श्रमसंस्कार तसेच विश्वबंधुत्वाची भावना, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन व संर्वधन आणि पर्यावरणीय संवर्धन या मूल्यांची जोपासना व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजने मार्फत शैक्षणिक वर्ष २०१७–१८ या काळात नियमित कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम, महामानवांचे स्मृतीदिन, विविध दिनविशेष, स्वयंसेवकांचे श्रमदान, विविध शिबीरे व अभियाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विशेषत: या शैक्षणिक वर्षांत नाविण्यपूर्ण आणि विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांसाठी विविध शासकीय, स्वयंसेवी व सार्वजनीक संस्था यांचा विशेष सहभाग, सहकार्य व सहयोग लाभला. या कार्यक्रमांचा अहवाल खालील प्रमाणे.

## १. नाविण्यपूर्ण उपक्रम :–

| अ.क्र | दिनांक | कार्यक्रमाचे स्वरूप | सहयोग / आयोजक | प्रमुख पाहुणे / मान्यवर | कार्यक्रमाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | २५ जुलै १७ | ‘जाऊ देवाचिया गावा’ सामाजिक जाणिवपर उपक्रम | चोपदार फौंडेशन, आळंदी व सकाळ चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे | मा. व्यंकटेश देशपांडे, पत्रकार, दैनिक सकाळ | स्वयंसेवकांनी पालखी तळ चुकलेल्या ७५ वारकरी बधुंना त्यांच्या मूळ पालखी तळावर पोहोच केले |
| २ | ८ ऑगस्ट १७ | रक्षाबंधनानिमित्त सामाजिक जाणिव जागृतीपर उपक्रम | लायन्स क्लब, फलटण | मा. दिलीप गुंदेचा अध्यक्ष, लायन्स क्लब, फलटण | पाच पांडव आश्रमशाळा अलगुडेवाडी येथील वि. भ. जमातीतील मुलांना रक्षाबंधन करण्यात आले |
| ३ | ६ डिसें. २०१७ | ‘मुक्तद्वार वाचन’ शैक्षणिक व सामाजिक जाणिव जागृतीपर उपक्रम | ग्रंथालय विभाग, मुधोजी महाविद्यालय, फलटण | मा. धैर्यशील जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद , फलटण | डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त ग्रंथालयामध्ये ‘मुक्तद्वार वाचन’ शैक्षणिक व सामाजिक जाणिव जागृतीपर उपक्रमाचे आयोजन केले. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना हवे ते पुस्तक हवा तितका वेळ वाचनासाठी देण्यात आले. |
| ४ | ५ सप्टे. २०१७ | ‘निर्माल्य दान व प्रदुशनमुक्त गणेशोत्सव रॅली’ पर्यावरण संवर्धनपर उपक्रम | नगर परिषद , फलटण | मा.श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, अध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा. | फलटण शहरातील सार्वजनिक व घरगुती गणेशोत्सवातील सुमारे २०० किलो. निर्माल्य जमा करण्यात आले व फलटण शहरात प्रदुशनमुक्त गणेशोत्सवाबाबात जनजागृती करण्यात आली. |

## २.विशेष अभियानांतर्गत उपक्रम

| अ.क्र | दिनांक | कार्यक्रमाचे स्वरूप | सहयोग / आयोजक | प्रमुख पाहुणे / मान्यवर | कार्यक्रमाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ जुलै १७ | 'शतकोटी वृक्ष लागवड अभियान' पर्यावरण संवर्धनपर उपक्रम | वन विभाग व म.रा. सामाजिक वनीकरण विभाग | मा.प्राचार्य डॉ.सुभाष रसाळ व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय व सेवक वृंद | महाविद्यालय परिसरात सुमारे ३५० झाडे लावण्यात आली. |
| २ | २७ जुलै १७ | संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळ स्वच्छता मोहिम | रा.से.योजना विभाग, सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे. | मा.श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, अध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा. | संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाची स्वच्छता करण्यात आली. |
| ३ | २८ जुलै व ३१ऑगस्ट १७ | 'मतदार जागृती अभियान' संविधानात्मक जागृतीपर उपक्रम | निवडणुक विभाग, तहसील कार्यालय, फलटण | मा. अनपट साहेब निवडणुक कार्यक्रम अधिकारी , तहसील कार्यालय, फलटण | महाविद्यालयातील सुमारे ४०० विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करण्यात आली. |
| ४ | २८ ऑक्टो. २०१७ | 'डेंग्यु प्रतिबंध जागृतीपर रॅली' आरोग्य संवर्धनात्मक उपक्रम | नगर परिषद, फलटण, आरोग्य विभाग, प. स. फलटण | मा. श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, चेअरमन, कृषि उत्पन्न बाजार समिती, फलटण | फलटण शहरामधून डेंग्यु प्रतिबंध जनजागृती रॅली काढण्यात आली. |
| ५ | ५ जाने. २०१८ | स्वच्छ भारत अभियानांतर्गत जनजागृतीपर उपक्रम | नार परिषद, फलटण, | मा.धैर्यशील जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद , फलटण | सुमारे ५०स्वयंसेवकांनी फलटण शहरातील विविध प्रभागामधील सर्व कुटुंबातील लोकांना स्वच्छ भारत मोबाईल ॲपविषयी प्रबोधन करण्यात आले. |

## ३.स्वयंसेवकाधिष्ठित विशेष उपक्रम

| अ.क्र | दिनांक | कार्यक्रमाचे स्वरूप | सहयोग / आयोजक | प्रमुख पाहुणे / मान्यवर | कार्यक्रमाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | २० जून २०१७ | पालखी पूर्वसुरक्षा व नियोजन सायकल रॅली | विभागीय पोलीस कार्यालय, फलटण | मा. विश्वास नांगरे पाटील, आयुक्त , कोल्हापूर विभाग | पोलीस स्टेशन, फलटण हद्द सुरवडी ते राजुरी या दरम्यान स्वयंसेवकांनी मा. विश्वास नांगरे पाटील यांच्यासमवेत सायकल रॅलीत सहभाग घेतला |
| २ | ९ ऑगस्ट १७ | शहिद मानवंदना कार्यक्रमात सहभागी स्वयंसेवक | जनशक्ती युवा विकास प्रतिष्ठान फलटण | मा.श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, अध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा. | ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शहीद जवानांना मानवंदना या कार्यक्रमात २५ स्वयंसेवकांचा सहभाग. |
|  | १५ ऑगस्ट १७ | कागदीकाम हस्तकला कार्यशाळा | ———————— | मा. महेंद्रकुमार लालाराम, राज्यस्थान | कागदीकाम हस्तकला प्रात्याक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले. |
| ३ | १५ ऑगस्ट १७ व २६ जाने. १८ | स्वातत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजीत 'रक्तदान शिबीर' | फलटण ब्लड बॅक, फलटण. लायन्स क्लब, फलटण. | मा. शिरीष दोशी, सदस्य, फ. ए. सोसायटी फलटण व मा. हेमंत रानडे, ट्रेझरर, ग. कौ. फ. ए. सोसायटी, फलटण. | रक्तदान शिबीरामध्ये ८६ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक कर्तव्य बजावले. |
| ४ | २५ सप्टें. १७ | राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन व 'पोस्टर प्रदर्शन' समारंभ | ———————— | मा. जीवन इंगळे, संस्थापक, सर्वोदय सामाजिक संस्था, बुध, जि. सातारा | स्वयंसेवकांनी तयार केलेल्या विविध सामाजिक व पर्यावरणीय विषयांवर सुमारे १५० पोस्टरांचे प्रदर्शन भरवण्यात आले. |
| ५ | ९ आक्टो. १७ | मा.श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजीत विशेष महास्वच्छता अभियान कार्यक्रम | ———————— | मा.प्राचार्य डॉ. सुभाष रसाळ व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी व सेवक वर्ग. | महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली. |
| ६ | २३ डिसें. १७ | मा. श्रीमंत विश्वजीतराजे नाईक निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजीत वृक्षारोपन कार्यक्रम | ——————— | मा. श्रीमंत विश्वजीतराजे नाईक निंबाळकर, सदस्य, प.स.फलटण | महाविद्यालयाच्या मुख्य रस्त्याच्या बाजूला वृक्षारोपन करण्यात आले. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | २६ जाने. २०१८ | ‘शहिद वीर जवान निलेश चव्हाण ज्योत’ राष्ट्रभक्तीपर उपक्रम | ---------- | मा. हेमंत रानडे, ट्रेझरर, ग.कौ.फ.ए.सोसायटी, फलटण. | तरडगाव येथून प्रस्थान व फलटण शहरातील विविध चौकातून महाविद्यालयामध्ये मा. हेमंत रानडे यांच्या शुभहस्ते स्वागत व मा. रमेश चोपडे, विभागीय पोलीस अधिकारी, फलटण यांच्याकडे सपूर्त. |
| ६ | २० फेब्रु. २०१८ | जलसंधारण : शाश्वत विकास कार्यशाळा | भूगोल विभाग, मुधोजी महाविद्यालय, फलटण | मा.गोरखनाथ डोईफोडे, तालुका कृषी अधिकारी, फलटण | जलसाक्षरता, जलसंधारण व जलसंवर्धन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. |

## ४.विशेष शिबीरे –

स्वयंसेवक सहभाग –

| अ.क्र | शिबीर स्तर | आयोजक | कालावधी | सहभागी स्वयंसेवक |
|---|---|---|---|---|
| १ | ‘आव्हान’राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर | राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | दि. १ ते १० जून २०१७ | १. गांधी राकेश रमेश<br>२. देवकुळे शेखर अशोक<br>३. लकडे दत्ता दिलीप<br>४. सावंत प्रदीप रमेश<br>५. काळाने राहुल बळासाहेब<br>६. शिंदे प्रियांका दिलीप<br>७. भिलारे प्रशांत केशव<br>८. सौदागर इब्राहिम हुसेन<br>९. पोंदे साई सुनिल<br>१०. नाळे प्रज्वल प्रभाकर<br>११. शहापूरकर रोहित माणिक<br>१२. काशिद पुजा दिनकर |
| २ | विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार | राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | दि. १५ते २१ जुलै २०१७ | १ लाळगे ऋषीकेश महादेव<br>२. सोरटे साहिल शंकर<br>३. गायकवाड चैतन्य किशोर |
| ३ | विद्यापीठस्तरीय विशेष श्रमसंस्कार | राष्ट्रीय सेवा योजना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | दि. २१ ते २७ सप्टे. २०१७ | १. साळवे के. ए.<br>२. आवळे के. आर.<br>३. बागाव एस. बी.<br>४. चौगुले व्ही.एल. |

**विशेष श्रमसंस्कार शिबीरे –**

**अ. राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर –**

दि. १० ते १६ मे २०१७ या कालावधीत मौजे भोसरे येथे या **राज्यस्तरीय विशेष महाश्रमसंस्कार** शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरामध्ये एकूण ३०० स्वयंसेवक सहभागी झाले होते. गावच्या शाश्वत सर्वांगिण विकासाच्या अनुशंगाने या शिबीरामध्ये प्रबोधनात्मक प्रभातफेरी, श्रमदान, स्वयंसेवकांसाठी विशेष उपक्रम, विविध मेळावे, प्रबोधनात्मक व्याख्यानमाला आणि उद्‌बोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिबीराचे उद्‌घाटन मा. डॉ. विलास नांदीवडेकर, कुलसचीव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे शुभहस्ते व मा. प्राचार्य विश्वासराव देशमुख, उपाध्यक्ष, फ.ए. सोसा. फलटण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. अध्यक्षस्थानी मा. विष्णु जाधव, ज्येष्ठ कार्यकर्ते हे होते. या शिबीराचा समारोप समारंभ प्रमुख अतिथी मा.विश्वास गुजर, तहसीलदार, कुलाबा यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला

प्रबोधनात्मक प्रभातफेरी या उपक्रमांतर्गत पिंगळा, वासुदेव, पोतराज व लोकसंस्कृतीचे उपासक व राष्ट्रसंत गाडगे महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रूपातून ग्रामविकासाचे महत्त्व सांगण्यात आले.

श्रमदानाच्या माध्यमातून पाणी फांऊडेशन आयोजित ‘वाटर कप’ स्पर्धेच्या अनुशंगाने जलसंवर्धन आणि जलसंधारणाची कामे करण्यात आली. यामध्ये सुमारे २००० समतल चर व बांध बंधिस्ती, वृक्षारोपनासाठी खड्डे काढण्यात आले. .

प्रबोधनात्मक व्याख्यानमाले अंर्तगत जलसाक्षरता या विषयावर विविध प्रबोधनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली. यामध्ये प्रा.डॉ. सतीश घाडगे, (विवेकानेद कॉलेज, कोल्हापूर) मा.शहाजी क्षीरसागर व मा. संपतराव पवार, (सामाजिक कार्यकर्ते) मा. प्रभाकर देशमुख, (विभागीय आयुक्त, कोकण विभाग) मा. श्रीमंत सुभद्राराजे नाईक निंबाळकर, नगरसेविका, न.प.फलटण, मा. श्रीमंत यशोधराराजे नाईक निंबाळकर, (सदस्या, ग.कौ. फ.ए. सोसा. फलटण) मा. इंद्रजीत देशमुख, (अतितिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, कोल्हापूर) या तज्ज्ञ मान्यवरांनी विविध विषयावर स्वयंसेवकांना व ग्रामस्थांना उद्‌बोधन व मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत सुनेत्रा पवार कलामंच, कांबळेश्वर यांचे कलापथक, भारूड मंडळ, सोनगाव, स्वयंसेवक व माजी स्वयंसेवक यानी पथनाट्य, नाटिका, लोकनृत्य, प्रबोधनात्मक गीत गायन केले.

या शिबीरात मा.ना.सदाभाऊ खोत, सहपालकमंत्री सातारा, मा.श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी, सातारा, मा. अतुल साळुखे, राज्यसंपर्क अधिकारी रा.से. योजना इ. राजकीय, सामाजिक व शैक्ष. क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेटी देऊन शुभेच्छा दिल्या. या शिबीरामध्ये मौजे भोसरे गावचे सरपंच मा.महादेव जाधव, व सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध शासकीय व खाजगी सहकारी संस्थेचे पदाधिकारी,तरूण मंडळे व समस्त ग्रामस्थ भोसरे यांनी बहुमोल सहकार्य करून हे शिबीर यशस्वी केले.

**ब. एकदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर –**

१. दि. १०.९. २०१७ रोजी महाविद्यालयात एकदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. यामघ्ये ७० स्वयंसेवकांचा सहभाग होता. यामध्ये महाविद्यालय परिसर स्वच्छता, वृक्षसंवर्धन हे उपक्रम राबविण्यात आले. मा.प्राचार्य विश्वासराव देशमुख उपाध्यक्ष, फ.ए. सोसायटी, फलटण यांनी विशेष मार्गदर्शन केले. डॉ. सुधीर इंगळे यांनी अंधश्रद्धानिमुर्लनपर चमत्काराचे सादरीकरण करून मार्गदर्शन केले.

२. दि. १.१०.२०१७ रोजी मौजे बीरदेवनगर येथे एकदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. यामघ्ये ५० स्वयंसेवकांचा सहभाग होता. यामध्ये वृक्षारोपन, वृक्षसंगोपन, परिसरस्वच्छता हे उपक्रम राबविण्यात आले. मा. चोरमले, अध्यक्ष बीरदेव देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

**क. सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर –**

दि. ९ जाने. ते १५ जाने. २०१८ या कालावधीत मौजे – आदर्की बु।। या शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरामध्ये एकूण १०० स्वयंसेवक सहभागी झाले होते. 'ग्रामीण विकास' या घोषवाक्यांतर्गत हे शिबीर आयोजीत करण्यात आले. गावच्या शाश्वत सर्वांगिण विकासाच्या अनुशंगाने या शिबीरामध्ये प्रबोधनात्मक प्रभातफेरी, श्रमदान, स्वयंसेवकांसाठी विशेष उपक्रम, विविध मेळावे, प्रबोधनात्मक व्याख्यानमाला आणि उद्‌बोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिबीराचे उद्‌घाटन फलटण,कोरेगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार मा. दिपकराव चव्हाण यांचे शुभहस्ते व मा.सौ.प्रतिभा अरविंद धुमाळ, सदस्या, प.स. फलटण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. अध्यक्षस्थानी मा.सुभाष धुमाळ, सरचिटणीस, सातारा जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस हे होते. या शिबीराचा समारोप समारंभ प्रमुख अतिथी मा.श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, अध्यक्ष, सातारा जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाला. या समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान मा.बाळकृष्ण कासार, संस्थापक अध्यक्ष, भैरवनाथ उद्योग समुह, आदर्की यांनी भूषविले. या समारंभास मा. धैर्यशील अनपट, सातारा जि.प.सदस्य, यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी फ.ए.सोसा.चे,प्रशासनाधिकारी मा.प्राचार्य अरविंद निकम, फ.ए. सोसा.चे, अधिक्षक, मा. श्रीकांत फडतरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रबोधनात्मक प्रभातफेरी या उपक्रमांतर्गत पिंगळा, वासुदेव, पोतराज व लोकसंस्कृतीचे उपासक व राष्ट्रसंत गाडगे महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रूपातून ग्रामविकासाचे महत्त्व सांगण्यात आले.

श्रमदानाच्या माध्यमातून सार्वजनीक ठिकाणांची स्वच्छता करताना ३ ट्रॉली घनकचरा काढण्यात आला तसेच टेकडी विकास उपक्रमांतर्गत सुमारे ८०० समतल चर काढण्यात आले. या शिवाय स्मशानभूमी, गणेश मंदीर, दत्त मंदीर, महादेव मंदिर या धार्मिक स्थळांची स्वच्छता व सुशोभिकरण व गावांतर्गत सुमारे ५ कि.मी. रस्त्याचे मुरूमीकरण करण्यात आले.

या शिबीरामध्ये स्वयंसेवकासाठी पारंपारिक खेळ, बाल आनंद मेळावा, युवा मेळावा, महिला मेळावा इ. विविध मेळाव्यांचे आयोजन करून त्याद्वारे संबंधीत घटकांना मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात आले. मोफत नेत्र व दंत चिकित्सा शिबीर (लाभार्थी – १९०) आयोजन करण्यात आले.

प्रबोधनात्मक व्याख्यानमाले अंर्तगत ग्रामीण विकासावर विविध प्रबोधनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली. यामध्ये मा.महादेव जाधव, (सरपंच, भोसरे, जि. सातारा) प्रा.डॉ.सुनिल सांवत, (किसनवीर महाविद्यालय वाई) प्रा. डॉ. मनोज गुजर, (कला वाणिज्य महाविद्यालय, देऊर) मा.विश्वास गुजर (तहसीलदार,कुलाबा) मा. सोमनाथ सुतार (सोमेश्वरनगर, बारामती) प्रा. डॉ. बाळासाहेब कांबळे, प्रा. डॉ. सुधीर इंगळे, (मुधोजी महाविद्यालय, फलटण) मा. ॲड. वर्षा देशपांडे (सामाजिक कार्यकर्त्या, सातारा) या तज्ज्ञ मान्यवरांनी विविध विषयावर स्वयंसेवकांना व ग्रामस्थांना उद्‌बोधन व मार्गदर्शन केले. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत सुनेत्रा पवार कलामंच, कांबळेश्वर यांचे कलापथक, शुभांगी शिदें यांचा 'मी जिजाऊ बोलतेय' हा एकपात्री प्रयोग, स्वयंसेवक व माजी स्वयंसेवक यानी पथनाट्य, नाटिका, लोकनृत्य, प्रबोधनात्मक गीत गायन केले; तर व जि. प. प्रा. शाळा, आदर्की, न्यू इग्लिश स्कूल, आदर्की, ॲम्बीशन इंग्लिश स्कूल, आदर्की व श्रीमंत शिवाजीराजे इग्लिश मिडीयम स्कूल, जाधववाडी यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले.

या शिबीरात राजकीय, सामाजिक व शैक्ष. क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेटी देऊन शुभेच्छा दिल्या. या शिबीरामध्ये मौजे आदर्की गावच्या सरपंच मा. सौ. चित्रा काकडे, उपसरपंच मा. समीर धुमाळ व सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच विविध शासकीय व खाजगी सहकारी संस्थेचे पदाधिकारी, तरूण मंडळे व समस्त ग्रामस्थ आदर्की यांनी बहुमोल सहकार्य करून हे शिबीर यशस्वी केले.

प्रा. सतीश पवार
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

प्रा.डॉ.अशोक शिंदे.
विभागीय समन्वयक व कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना